Reg. No. NP CITY/236/2018-20.


सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक १९ ] गुरुवार ते बुधवार, मे ८-१४, २०२५/वैशाख १८-२४, शके १९४७ [पृष्ठे १२, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.


# भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९३.

### संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्रमांक डि.टि.पी.-वि.यो.पुसद (सु.)-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-६-१९९३. —

ज्याअर्थी, पुसद नगर परिषदेची विकास योजना, (सुधारित) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) चे तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस-२७९५-१२६७-प्र.क्र.१९८-९५-नवि-१३, दिनांक २६ मे, १९९८ (यापुढे “उक्त अधिसूचना” असे संबोधिले आहे) अन्वये भागशः मंजूर केली असून ती दिनांक २६ जुलै, १९९८ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे “उक्त मंजूर विकास योजना” असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये, मौजा पुसद येथील स. नं. १६८ पै. ही जमीन आरक्षण क्रमांक ६६ “सार्वजनिक बांधकाम विभागाकरीता” (यापुढे “उक्त आरक्षण” असे संबोधिले आहे) या आरक्षणाने बाधित होत असून, सदर आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समूचित प्राधिकरण ‘ सार्वजनिक बांधकाम विभाग ’ (B & C) आहे (यापुढे “उक्त समूचित प्राधिकरण” असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षांच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनीचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, मौजा पुसद येथील खंड - १, नवीन स.नं. ७७ पैकी व ७८ पैकी (भूमि अभिलेख, पुसद यांचेकडील क्रॉस रेफरन्स तक्त्यानुसार त्याचे मूळ स. नं १६८) या जमिनीमधील (यापुढे “उक्त जमीन” असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्रासंदर्भाने संबंधित जमीन मालक (यापुढे “उक्त जमीन मालक” असे संबोधिले आहे) यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीन्वये उक्त समूचित प्राधिकरणावर दिनांक ०७ सप्टेंबर, २०१८ रोजी सूचना (यापुढे “उक्त सूचना” असे संबोधिले आहे) बजावलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालक यांनी उक्त सूचना बजाविल्याचे दिनांकानंतर उक्त समूचित प्राधिकरणाने विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेली नाही अथवा उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे अनुषंगाने उक्त समुचीत प्राधिकरणाने उक्त जमीन मालकास उद्देशून दिलेल्या दिनांक ०२ नोंव्हेंबर, २०१८ रोजीचे पत्रान्वये ' मौ. काकडदाती येथील स.नं. १४/७ मधील ४ हे. जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची असून, उक्त आरक्षणासाठी राखीव असलेल्या उक्त जमिनीची या विभागाला आवश्यकता नसल्यामुळे, उक्त आरक्षण रिलीज करण्यास हरकत नाही,' असे जिल्हाधिकारी, यवतमाळ व मुख्याधिकारी, नगर परिषद, पुसद इ. कार्यालयांना अवगत केले आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, पुसद यांनी, दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजीचे पत्र क्र.२४९/२०२३ अन्वये 'कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांनी बी. ॲन्ड सी करीता राखीव असलेल्या जमिनीची या विभागाला आवश्यकता नसून, उक्त आरक्षण रिलीज करण्यास हरकत नसल्याचे अवगत केले आहे व कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही' असे नमूद करुन, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदींतर्गतचा प्रस्ताव संचालनालयास विहीत मार्गाने सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी त्यांचेकडील दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजीचे पत्र क्र. १५६२, मध्ये प्रामुख्याने, उक्त जमिनीचे एकूण १.८९ हे.क्षेत्र उक्त आरक्षणाने बाधित होत असून, उक्त जमीन संपादनाबाबतची कार्यवाही समूचित प्राधिकरणाकडून विहीत मुदतीत केली नसल्यामुळे उक्त आरक्षण व्यपगत ठरते असे नमूद करुन, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) तरतुदींतर्गत आदेश निर्गमित करणेबाबत संचालनालयास अहवाल सादर केलेला आहे ;

प्रस्तावासोबतचे उक्त जमिनीचे मोजणी नकाशानुसार, उक्त जमिनीचे अंदाजे १.८३ हे. क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये व्यपगत ठरते, असे स्पष्ट होत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त जमिनीचे १.८३ हे. क्षेत्रावरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत;

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहेः-

**परिशिष्ट**

| अनुक्रमांक | नगर परिषद, मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील आरक्षण व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र* हेक्टर | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | पुसद, नगर परिषद, मौजा पुसद, ता. पुसद, जिल्हा यवतमाळ. | आरक्षण क्रमांक ६६, " सार्वजनिक बांधकाम विभागाकरीता "(बी ॲन्ड सी) *उक्त विकास योजना मंजुरीवेळी, मूळ आरक्षणाचे हद्दीत बदल झाल्याने, वि. यो. अहवालानुसारचे ०.६० हे. क्षेत्र या ठिकाणी नमूद करता येणार नाही. | मौजा पुसद, खंड-१, **नवीन स. नं. ७७ (भाग) व ७८ (भाग)** [मुळ सं. नं. १६८ पैकी] | १.८३ हे. |

**टीपः-** १. उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, पुसद, जि. यवतमाळ यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अविनाश भा. पाटील,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक १७ एप्रिल, २०२५.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९४.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No.D.T.P-D.P.-Pusd(R)-Sec-127(2)-Order-TPV-VI-1993.–

Whereas, the Development Plan of Pusad Municipal Council (Revised) has been partly sanctioned as per the provisions of section 31 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act. 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* its Notification No.TPS-2795-1267-CR-198-95-UD-13, dated 26th May, 1998 (hereinafter referred to as "the said Notification") & come into force with effect from dated 26th July,1998 (hereinafter referred to as the "said Sanctioned Development Plan");

And whereas, in the said Sanctioned Development Plan, the land bearing S. No. 168 (Part), of Mouza Pusad is affected by the Reservation No. 66 "Site for B & C", (hereinafter referred to as "the said Reservation") for which Appropriate Authority for acquisition and development of the said Reservation is Public Works Department (B & C), (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land under said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan came into force;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the land bearing New S. No. 77 (Part) & 78 (Part) [As per Cross-reference Table of Land Record Office, Pusad, it's original S. No. 168] of Mouza Pusad, Khand-1 (hereinafter referred to as “the said Land”) had served a notice as per the provisions of section 127*(1)* of the said Act in (respect of the area affected by the said Reservation (hereinafter referred to as "the said Notice") on. the said Appropriate Authority on 07th September, 2018;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127 *(1)* of the said Act has been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period from the date of service of the said notice by the said land owner;

And whereas, in accordance with the said Reservation, the said Appropriate Authority has informed to the District Collector, Yavatmal and Chief Officer, Municipal Council, Pusad *etc.* offices *vide* letter dated 02nd November, 2018 addressed to the said Land Owner that, as the land bearing

S. No. 14/7 admeasuring 4 Ha. at Mouza Kakaddati is owned by the Public Works Department, since this Department does not require the land reserved for B & C, there is no objection to releasing the said Reservation,';

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Pusad, vide letter No. 249/2023 dated 22nd September, 2023, ' The Executive Engineer, Public Works Department, Pusad has given a letter stating that, since this department does not require the land reserved for B&C, there is no objection to releasing the said Reservation &, no action has been taken by the office', a proposal under the provisions of section 127*(2)* of the said Act has been submitted to the Directorate in the prescribed manner;

And whereas, the Joint Director, Town Planning, Amravati Division, Amravati, in his letter No. 1562, dated 30th December, 2024, has stated that, the total area admeasuring 1.89 Ha. of the said Land is affected by the said Reservation, and since the action regarding the acquisition of the said land has not been taken by the Appropriate Authority within the prescribed period, the said reservation has lapsed, and has submitted a report to the Directorate regarding the issuance of an order under the provisions of section 127*(2)* of the said Act;

As per the Measurement Plan the said Land accompanying the proposal, it is clear that the said Reservation on an area of approximately 1.83 Ha. of the said Land is lapsed under the Provisions of section 127(2) of the said Act;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Land in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of section 127*(2)* of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on area 1.83 Ha. of the said Land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No.TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01st December, 2016, has delegated the powers exercisable by it under section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the development plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said Land as per the provisions of section 127 *(2)* of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Development Plan, the following new entry shall be added:-

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council, Mouza, Taluka and District | Reservation in the said Sanctioned Development Plan & its Approximate Area* as per D.P. Report | Description of the said Land | Approximate Area lapsed from the said Reservation (HA.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Pusad, Municipal Council, Mauja Pusad, Taluka- Pusad, Dist. Yavatmal | Reservation No. 66 "Public Works Department (B. C.)" *Since at the time of sanctioning of the said Development Plan, changes | Mauja Pusad, Division-1, **(S. No. 77(Part) and 78 (Part)** [Part of Orignal S. No. 168] | 1.83 HA. |

SCHEDULE--*Contd.*

| (1) | (2) | (3) | (4) | (5) (H. A.) |
|---|---|---|---|---|
| | | has been made in the boundaries of the original reservation, no mention here the area 0.60 Ha. as per D. P. report. | | |

*Note*:- 1. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent lands under the said Sanctioned Development Plan.

2. A copy of the part plan of the said Sanctioned Development Plan of showing the part area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Pusad, District Yavatmal during office hours on all working days for inspection to public upto one month.

3. This Order shall also be published on the Directorate's official website *www.dtp.maharashtra.gov.in*

AVINASH B. PATIL,
Director of Town Planning,
Maharashtra State,
Pune.

Pune :
Dated the 17th April, 2025.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९५.

## मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५**

### अधिसूचना

क्रमांक नपम-सा.प्र.-७८९-२०२५.—

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश करण्यामागे दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगरपरिषद या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरीक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०१५-प्र.क्र.१८९-नवि १४, दिनांक २३ जून, २०१५ नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

मा. शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकूण ७४ सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. परंतु मलकापूर नगरपरिषदेकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या ५१ इतकी होते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ कलम ३ अन्वये सदर ५१ लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी व व्दितीय अपिलिय अधिकारी यांची यादी विवरणपत्र ०१ अन्वयेसोबत जोडली आहे.

## कलम-३ अन्वये मलकापूर नगरपालिका (वर्ग) ने जाहीर करावयाचा लोकसेवा तपशिल

| अ. क्र. | लोकसेवेची सूची | आवश्यक कागदपत्र | शुल्क | नियम कालमर्यादा | पदनिर्देशक अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १) | नव्याने कर आकारणी/ New Tax Assessment | १.विहित नमुन्यातील अर्ज २. भोगवटा प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २) | पुनः कर आकारणी/ Re-assessment of tax | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३) | कराची मागणीपत्र तयार करणे/To prepare tax demand notice | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ०३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४) | करमाफी मिळणे/ To get Tax Exemption | १.विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ०७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५) | थकबाकी नसल्याचा दाखला देणे/To issue no dues Certificate | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ०३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६) | मालमत्ता कर उतारा देणे/To issue extract of Property Tax | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ०३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ७) | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे/To get exemption from tax to the unoccupied properties | १.विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ८) | मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे/ To issue Certificate of transfer of property by other way | १. विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला ३. मालकी हक्काची कागदपत्रे नोंदणीकृत खरेदीखत | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ९) | स्वयंमूल्यांकन/Self valuation | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १०) | आक्षेप नोंदविणे/To record objections | १.विहित नमुन्यातील अर्ज २. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**तपशिल—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११) | उप विभागामध्ये मालमत्ता विभाजन/ Division of property in sub division | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे/नोंदणीकृत खरेदीखत, वाटणीपत्र, बक्षीसपत्र इ. | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १२) | मालमत्ता पाडणे व पुनःर्बांधणी कर आकारणी/Tax assessment on demolishing and reconstruction of the property | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १३) | नविन नळजोडणी New water connection | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्क कागदपत्र<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १४) | मालकी हक्कात बदल करणे/To change ownership rights | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्क कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १५) | तात्पुरते/कायमस्वरुपी नळजोडणी खंडीत करणे/To disconnect temporary/permanent water connection | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १६) | पुनजोडणी करणे/ Reconnect the connection | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १७) | वापरामध्ये बदल करणे/ Change in use | १.विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १८) | पाणी देयक तयार करणे/To prepare water bill | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १९) | प्लंबर परवाना/ Plumber License | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**तपशिल**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०) | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे/ Renewal of Plumber License | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. शैक्षणिक अर्हता बाबतचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २१) | थकबाकी नसल्याचा दाखला/No dues Certificate | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २२) | नादुरुस्त मीटर तक्रार करणे/To complaint about faulty meter | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २३) | अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे/To Unauthorized Water Connection | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २४) | पाण्याची दबाव क्षमता तक्रार/Complaint about water pressure | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २५) | पाण्याची गुणवत्ता तक्रार/Complaint about quality of water | विहित नमुन्यातील अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २६) | व्यापार व्यवसाय साठा करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणे/ Trade NOC | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २७) | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे/ Mandap NOC | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. रस्ता पुनर्स्थापना करार | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २८) | नवीन परवाना मिळणे/ Getting New Licenses | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २९) | परवान्याचे नुतनीकरण/ Renewal of Licenses | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**तपशिल**–चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०) | परवाना हस्तांतरण/ Transfer of Licenses | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३१) | परवाना दुय्यम प्रत/ Duplicate Copy of Licenses | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३२) | व्यवसायाचे नाव बदलणे/ Change in name of Business | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३३) | व्यवसाय बदलणे/ Change the Business | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३४) | परवाना/भागीदाराचे नाव बदलणे/Change the business holder/Partner | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३५) | भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ/कमी)/ Change number of partners (increase/Decrease) | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३६) | परवाना रद्द करणे/ Cancellation of Licenses | योग्य प्रकारे भरलेले अर्ज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३७) | कालबाह्य परवानासाठी नुतनीकरण सूचना/ Notice for renewal of expired Licenses | १. योग्य प्रकारे भरलेले अर्ज २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३८) | जाहिरात परवाना/ आकाशचिन्ह परवाना (Signange License) नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज २. संबंधित न.प./न.पं ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**तपशिल**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९) | सिनेमा चित्रीकरण परवाना (Movie Shooting License) नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प./न.पं ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४०) | व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण (ऑटो-रिन्युअल) Auto-renewal of Trade License | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. कोणतीही संबंधित न.प./न.पं ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४१) | मोबाईल टावर परवाना (Mobile Tower Approval) (Ground Base Tower & Roof Top Tower) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना<br>३. संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा<br>४. वैध भाडेकरारनामा<br>५. स्थळाचा नकाशा (१:१०००)<br>६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे त्याचा वैध भोगवटा प्रमाणपत्र<br>७. संबंधित इमारतीच्या/जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र<br>८. सक्षम प्राधिकाऱ्याचे अग्निशमन ना-हरकत दाखला<br>९. सक्षम प्राधिकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र (Ground Base Owner & Roof Top Tower)<br>१०. पर्यावरण विभागाची ना-हरकत प्रमाणपत्र<br>११. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र<br>१२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने/दस्तऐवज | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४२) | रस्ता खोदाई परवानगी देणे (To Grant Road Cutting Permission) नवीन परवाना व नूतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प./न.पं. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. शासना द्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

तपशिल—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३) | राज्याच्या खाद्य परवान्याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे `(To issue NOC form Muncipility or other Local Body for State License for Food Business) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प/न.पं.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना/कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्र | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४४) | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्यविषयक ना-हरकत दाखला (To issue Health NOC by Municipality/ Panchayat for Food Registration Certificate) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना/कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४५) | लॉजिंग हाऊस परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | ५००/- | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह-आयुक्त | विभागीय सह-आयुक्त |
| ४६) | लॉजिंग हाऊस परवान्याचे नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | ५००/- | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह-आयुक्त | विभागीय सह-आयुक्त |
| ४७) | मंगल कार्यालय/ सभागृह वगैरे परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | ५००/- | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह-आयुक्त | विभागीय सह-आयुक्त |
| ४८) | मंगल कार्यालय/ सभागृह वगैरे पर परवानाचे नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | ५००/- | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह-आयुक्त | विभागीय सह-आयुक्त |

**तपशिल—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४९) | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | ५००/- | १५ दिवस | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय सह-आयुक्त |
| ५०) | भूमीगत दुरसंचार वाहिनी (ऑप्टीकल फायबर केबल) टाकण्यासाठी | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगर परिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी | प्रधान सचिव |
| ५१) | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, ८ मधील तरतुदीनुसार १९७५ मधील कलम वृक्ष तोंड परवानगी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | ५००/- | ४५ दिवस | वृक्ष अधिकारी | मुख्याधिकारी | वृक्ष प्राधिकरण अधिकारी |

**(अवाच्य),**

मुख्याधिकारी,

नगर परिषद, मलकापूर.

मलकापूर :

दिनांक २ एप्रिल, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.